**मुख्य कार्यालय, विरार**

**विरार (प),**

**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890

फॅक्स : 0250-2525107

ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**

**दिनांक : 22/05/2025**

## वसई विरार शहर महानगरपालिकेत 'खरेदी व बांधकामे निविदा कार्यपद्धती कार्यशाळा' संपन्न

मा.आयुक्त तथा प्रशासक श्री.अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांच्या संकल्पनेतून आज दि.२२ मे २०२५ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालयातील सभागृहात "खरेदी व बांधकामे निविदा कार्यपद्धती कार्यशाळा" संपन्न झाली. या कार्यशाळेत मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.इंद्रजीत गोरे व मा.उप मुख्य लेखापरीक्षक श्री.मनोज पवार यांनी उपस्थितांना संबोधीत करून मार्गदर्शन केले.

खरेदी व बांधकामे निविदा कार्यपद्धतीसंबंधी निर्गमित झालेले नवीन शासन निर्णय व कायदे, शासकीय ध्येय-धोरणे, निविदा कार्यपद्धतीत करावयाचे व झालेले बदल यासंबंधी महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना योग्य मार्गदर्शन व माहिती देऊन सध्या राबविण्यात येत असलेल्या निविदा कार्यपद्धतीतील त्रुटी दूर करणे व निविदा कार्यपद्धती नियमानुसार सुरळीत करणे हे या कार्यशाळेचे मुख्य उद्दिष्ट होते. मा.उप मुख्य लेखापरीक्षक श्री.मनोज पवार यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना पीपीटी द्वारे निविदा कार्यपद्धतीची विस्तृत माहिती सादर केली. तसेच उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी निविदा प्रक्रियेविषयी विचारलेल्या शंकांचे निरसनही यावेळी करण्यात आले. यावेळी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे तसेच मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.इंद्रजीत गोरे यांनीही उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेस मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.इंद्रजीत गोरे, उप-आयुक्त श्री.सुभाष जाधव, उप-आयुक्त श्रीमती अर्चना दिवे, मा.उप मुख्य लेखापरीक्षक श्री.मनोज पवार, महानगरपालिकेचे सर्व सहा.आयुक्त, अभियंते, विभाग प्रमुख, संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मुख्य कार्यालय विरार

वसई विरार शहर महानगरपालिका